# ग्राहक गा-हाणे निवारण मंच

## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

## औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.

**Old Power House Premises, Dr.Ambedkar Road, Aurangabad. Phone: 0240 - 2336172**

**No,CGRF/AZ/JLN/ 178 / 2009 /12 /** **Date :-**

**To,**
**The Executive Engineer ( Administration)**
**O/O Superintending Engineer ,**
**O&M Urban Circle , M.S.E.D.C.L.,**
**Aurangabad.**

**Sub**:- Forwarding of grievance in respect of Shri R.D.Dixit Dixit Galli, Parture, Dist,Jalna( Consumer No. 524010014700)

Dear Sir,

Please find enclosed herewith a copy of the grievance application received by the Forum from Shri R. D. Dixit r/o Dixit Galli, Partur , Dist.Jalna (Consumer No. 524010014700)

You are requested to submit your para wise reply before 17.02.09. The hearing in the matter is kept on 17.02.09 at 11=30 hrs.

Encl: As above

**Member/Secretary,**
**CGRF(AZ) MSEDCL**
**Aurangabad.**

**Copy to:-**
Shri R. D. Dixit
r/o Dixit Galli,
Partur , Dist.Jalna

# ग्राहक गा-हाणे निवारण मंच

## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.

**तक्रार क्र.सीजीआरएफ/एझेड/जालना/१७८/२००९/१२**

**तक्रार दाखल दिनांक ;- ३१/०१/२००९**
**निकाल दिनांक ;- १६/०३/२००९**

**श्री रघुनाथ दिगंबरराव दिक्षित,**
**दिक्षित गल्ली, ता. परतुर**
**जिल्हा जालना.**
**(ग्राहक क्र.५२४०१००१४७००) अर्जदार/ग्राहक**

**विरुध्द**

**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित**
**जालना.**

**गैरअर्जदार**

| | | |
|---|---|---|
| **कोरम** | **विष्णु अं. हंबिरे** | **अध्यक्ष** |
| | **हेमंत अ. कापडीया** | **सदस्य** |
| | **प्र. अ. सगणे** | **सदस्य/सचिव** |

# आदेश

अर्जदाराने ग्राहक गा-हाणे निवारण मंचासमोर 'अनुसुची - अ' मध्ये, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गा-हाणे निवारण मंच व लोकपाल ) विनियम २००६ च्या नियम ६.१० अंतर्गत

तक्रार दाखल केली आहे. अर्जदाराने दाखल केलेल्या तक्रारीची एक प्रत दिनांक ३१/०१/२००९ रोजी जालना मंडळाचे कार्यकारी अभियंता ( प्रशासन ) व नोडल अधिकारी, जालना यांना पाठविण्यात आली. अर्जदाराच्या गा-हाण्याबाबतची सुनावणी दिनांक १७/०२/२००९ रोजी ठेवण्यात आली.

ग्राहकाने दाखल केलेल्या तक्रारीचा सारांश खालीलप्रमाणे आहे.

१) अर्जदाराने महावितरण वीज कंपनी उपविभाग परतुर यांच्याकडुन घरगुती वापरासाठी वीज पुरवठा घेतला असुन दिनांक ३०/०९/२००७ रोजी देण्यात आलेल्या वीज बिलात मीटर वरील रिडिंग ५२७१ अशी दाखवुन बिल आकारणी करण्यात आली. सदरील रिडिंग चुकीची असल्याचे अर्जदाराचे म्हणणे असुन याबाबत महावितरणच्या संबंधीत विभागाकडे तक्रार केल्यानंतर त्याची कोणतीही दखल घेण्यात आली नसल्याचे त्यांनी आपल्या तक्रारीत पुढे म्हटले आहे. महवितरण वीज कंपनीचे सहाय्यक अभियंता, परतुर उपविभाग यांच्याकडे वीज बिल दुरूस्ती करून देण्याबाबत सतत पाठपुरावा केल्यानंतर ही त्याचे बिल दुरूस्ती करून देण्यात आले नसल्यामुळे त्यांनी मंचात ही तक्रार दाखल केली असुन महावितरण कंपनीस सुधारीत वीज बिल तसेच नुकसान भरपाई देण्याबाबत आदेश देण्याची विनंती मंचास केली आहे.

२) दिनांक १७/०२/२००९ रोजी घेण्यात आलेल्या सुनावणीस अर्जदार श्री आर डी दिक्षित उपस्थित होते. महावितरणचे जालना विभागाचे नोडल अधिकारी श्री सागजकर उपस्थित होते. त्यांनी या प्रकरणाचा जवाब दाखल करण्यासाठी मुदतवाढ मागितली मंचाने त्यांची विनंती मान्य करून पुढील सुनावणी २५/०२/२००९ रोजी घेण्याचे ठरविले.

३) दिनांक २५/०२/२००९ रोजी अर्जदार व नोडल अधिकारी उपस्थित होते. नोडल अधिकारी यांनी अर्जदारास चुकीची मीटर रिडिंग घेतल्यामुळे वाढीव बिल देण्यात आल्याचे मान्य केले व सुधारीत वीज बिलाचा प्रस्ताव मंचात

दाखल केला. अर्जदारास वीज बिलात ८८१४ रूपये कमी करून देण्याची तयारी त्यांनी दर्शविली व मंचाने मान्यता दिल्यास अर्जदारास जानेवारी २००९ मध्ये ३१४/-रूपयाचे वीज बिल देण्यात येईल असे सांगितले. मंचाने नोडल अधिकारी यांनी दाखल केलेल्या पस्तावाची प्रत अर्जदारास दिली. अर्जदाराने सदरील सुधारीत वीज बिल मान्य असल्याचे सांगितले

४) मंचाने दोन्ही बाजुकडुन दाखल झालेल्या कागदपत्रावरून व नोडल अधिकारी यांनी दाखल केलेल्या सुधारीत वीज बिल प्रस्तावाची पाहणी केल्यावर ते योग्य असल्याचे आढळुन आले. अर्जदाराने मंचात दाखल केलली तक्रार योग्य असुन त्यांना महावितरण कंपनीतर्फे चुकीची मीटर रिडिंग घेण्यात आल्यामुळे वाढीव बिलाची आकारणी करण्यात आल्याचे स्पष्ट होते.अर्जदार नुकसान भरपाई मिळण्यास पात्र आहे.

## आदेश

१) महावितरण वीज कंपनीने अर्जदारास बिल रिव्हीजन प्रस्तावाप्रमाणे ८८१४ रूपयाचे क्रेडीट देवुन ३० दिवसात सुधारीत वीज बिल द्यावे.

२) वरील प्रमाणे देण्यात येणा-या सुधारीत वीज बिलात कोणतेही व्याज व दंड आकारू नये.

३) महावितरण कंपनीने अर्जदारास रूपये २५०/-नुकसान भरपाई ३० दिवसांत द्यावी.

वरील आदेशाचे ग्राहक व महावितरण कंपनी यांनी पालन करावे व त्याबाबत मंचास कळवावे.
गा-हाणे निकाली काढण्यात आले असुन हे ग्राहकास व वितरण कंपनीस कळवावे.

| | | |
|---|---|---|
| **हेमंत अ. कापडिया** | **प्र. अ. सगणे** | **विष्णु अं. हंबिरे** |
| **सदस्य** | **सदस्य/सचिव** | **अध्यक्ष** |

# ग्राहक गा-हाणे निवारण मंच
## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.

---

जुने पावर हाऊस परिसर.डॉ.बाबासाहेब आंबेडकर रोड, मिल कॉर्नर, औरंगाबाद. - ४३१ ००१, दुरध्वनी व फॅक्स -०२४० - २३३६१७२.

---


**क्र.सीजीआरएफ/एझेड/जालना/१७८/२००९/१२** **दिनांक ;-**

**प्रति,**
**श्री रघुनाथ दिगंबरराव दिक्षित,**
**दिक्षित गल्ली, ता. परतुर**
**जिल्हा जालना.**

( तक्रार क्र.सिजीआरएफ/एझेड/यु/१७८/२००९/१२ )

आपण दिनांक ३१/०१/२००९ रोजी दाखल केलेल्या तक्रारीवरील या मंचाचा आदेश सोबत जोडला आहे. हा आदेश मान्य नसल्यास आपण विद्युत लोकपाल यांच्याकडे ६० दिवसाच्या आंत अपिल दाखल करू शकता.

**सदस्य/सचिव**
**ग्राहक गा-हाणे निवारण मंच**
**म.रा.वि.वि.कं.म.औरंगाबाद.**

**प्रती, सविनय सादर,**
**मुख्य अभियंता परिमंडळ कार्यालय,**
**म.रा.वि.वि.क.मर्या.औरंगाबाद.**

**प्रती,कार्यकारी अभियंता (प्रशासन),**
**अधिक्षक अभियंता यांचे कार्यालय,**
**म.रा.वि.वि.कं.म. शहर मंडळ, औरंगाबाद**
**माहिती व उचीत कारवाही करीता**

**विद्युतलोकपालाचा पत्ता,**
**विद्युत लोकपाल,**
**महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग,**
**६०६-६०८, केशवा, बांद्रा - कुर्ला कॉम्प्लेक्स, मुंबई - ४०० ०५१.**
**दुरध्वनी क्र. ०२२-२६५९०३३९.**